# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक
गडचिरोली, दिनांक २६/०८/२०१७

## ***गडचिरोली पोलीस दलासमोर २ लाख ५० हजार बक्षिस असणाऱ्या एका जहाल नक्षलवादयाचे आत्मसमर्पन***

महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या आत्मसमर्पन योजनेमुळे गडचिरोली जिल्हयातील नक्षलवादी मोठया संख्येने आत्मसमर्पन करीत आहेत. आतापर्यंत वरिष्ठ नक्षल सदस्यांसह अनेक जहाल नक्षल्यांनी आत्मसमर्पन केल्याने व पोलीस दलाने त्यांचे पुनर्वसन घडवून आणल्याने नुकतेच चालू आठवडयामध्ये एकूण २ लाख ५० हजार बक्षिस असलेला एका जहाल नक्षलवादी याने आत्मसमर्पन केले आहे. यामुळे गडचिरोली जिल्हयातील नक्षलवादी चळवळीला जबर धक्का बसला आहे. गडचिरोली पोलीसांनी आतापर्यंत केलेली कामगिरी तसेच जनतेचा संपादन केलेला विश्वास यामुळे नक्षलवादी मोठयाप्रमाणात आत्मसमर्पन करीत आहेत. मा. विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षलविरोधी अभियान) श्री. शरद शेलार सा़ो. व मा. पोलीस उपमहानिरीक्षक गडचिरोली परिक्षेत्र कॅम्प नागपुर श्री. अंकुश शिंदे सा़ो. यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिक्षक सा़ो. डॉ. अभिनव देशमुख यांच्या समोर एका जहाल नक्षलवाद्याने आत्मसमर्पन केले आहे.

१) **<u>गोमजी ऊर्फ अरसु चैतु जेट्टी</u>** - हा कंपनी क्रमांक १० सदस्य म्हणून कार्यरत होता. तो सन २००९ ला गट्टा एलओएस दलममध्ये सदस्य पदावर भरती झाला होता. त्यानंतर तो प्लाटून क्रमांक १९ सदस्य म्हणून कार्यरत होता. त्यानंतर सन-२०१० मध्ये कंपनी क्रमांक १० मध्ये बदली होवून सदस्य पदावर कार्यरत होता. मौजा रेला जंगल परिसर चकमक, इंद्रावती जंगल परिसर चकमक, अशा चकमकीसह गंभीर गुन्हयात त्याचा सहभाग होता. शासनाने त्याचेवर २ लाख ५० हजार रुपयाचे बक्षिस जाहिर केले होते.

पोलीस विभागाने आत्मसमर्पन करण्याचे केलेले आवाहन व शासनाची आत्मसमर्पन योजना आणि पोलीस दलाने भुखंड, आर्थिक मदत, रोजगाराची उपलब्धता, नसबंदी रिओपनिंग यांसारख्या माध्यमातून आत्मसमर्पीतांचे पुनर्वसन घडवून आणल्याने सन २०१७ या चालु वर्षात आतापर्यंत एक कंपनी सदस्य, एक एरिया कमिटी सदस्यासह विविध

दलमच्या तब्बल १७ नक्षल सदस्यांनी आत्मसमर्पन करुन नक्षल चळवळीला जबर हादरा दिला आहे. आत्मसमर्पित लोकांच्या आत्मसमर्पणातून प्रेरणा घेवून दलममध्ये कार्यरत इतर सदस्यही नक्कीच आत्मसमर्पण करतील असा विश्वास डॉ. अभिनव देशमुख, पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांनी दर्शविला आहे. यासोबतच पोलीस अधिक्षकांनी दलममध्ये कार्यरत नक्षल सदस्यांना आत्मसमर्पण करण्याचे आवाहन करुन आत्मसमर्पण योजना अधिक प्रभाविपणे राबवून अधिकाधिक नक्षल सदस्यांचे आत्मसमर्पण घडवून आणण्याचे संकेत दिले आहेत.

